माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००७८३**

**अपिलार्थी श्री. मयुर रामनाथ केणी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
तहसिलदार बोरीवली यांचे कार्यालय, डॉ.न.रा.करोडे मार्ग,
नाटकवाला लेन,एस.व्ही.रोड, बोरीवली (प.), मुंबई-९२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
तहसिलदार बोरीवली यांचे कार्यालय, डॉ.न.रा.करोडे मार्ग,
नाटकवाला लेन,एस.व्ही.रोड, बोरीवली (प.), मुंबई-९२

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०५.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०९.१२.२०२४ | | १५.०१.२०२५ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २७.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती देण्यात आलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. ०९.१२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"मौजे कांदिवली, तालुका बोरीवली सर्वे क्रमांक २८/अ/३ व इतर फेरफार क्र. ३५७, हुकुम नं. ३/१९५४ दिनांक रोजी आदेश झाल्याची प्रत मिळण्यात यावी किंवा संचिका पडताळणी करून आवश्यक कागदपत्रे मिळण्यात यावे."*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. १७.०२.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. आयोगाच्या कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क केला असता जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, त्यांची तब्येत ठीक नसल्यामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. तसेच त्यांनी अनुपस्थितीबद्दल दिलगीरी व्यक्त करुन पुढील तारीख देण्याची विनंती केली.

४. सदर प्रकरणी कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

..२/-

५. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींनी मागणी केलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १९.०५.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

प्रदीप व्यास 5-5-2026

**मुंबई**
**दिनांक : ०५.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई